म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय सा. वा.
दा.क्र. 9234



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401235
BVBK-0401235

# मराठी मुद्रणाचा प्राणदाता

कांहींतरी नवेंच करा : २०

# मराठी मुद्रणाचा प्राणदाता

••

वि. वा. हडप

••

पन्नास नये पैसे

दा.क्र.१२३५ दि.२०।५।८७
बा.वा.

BVBK-0401235

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राउण्ड बिल्डिंग, मुंबई २



'मोहरेदार छपाई' म्हणून उत्तम छपाईचा बहुमानानें उल्लेख केलेला आपण वाचतों. ही मोहरेदार छपाई होण्यासाठीं छपाईला लागणारे टाइप अतिशय सुबक, रेखीव, वळणदार आणि सुद्ध असावे लागतात. मराठी मुद्रणांत ही अत्यावश्यक कामगिरी जावजी दादाजींनीं मोठ्या मेहनतीनें करून ठेवलेली आहे. टाइप हा मुद्रणाचा प्राणच. म्हणूनच, जावजी दादाजींचा 'मराठी मुद्रणाचा प्राणदाता' असा गौरव करणें योग्य ठरेल. एका सामान्य माणसाची ही असामान्य कर्तबगारी !

★

श्री : १७५ : २ [ ३-६२ ]

© १९५९
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ति दुसरी : १९६२

मूल्य ५० नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.

मराठी मुद्रणाचा प्राणदाता

# जावजी दादाजी

## १ : आशा कीं निराशा ?

पाऊस यावा यावा म्हणून आशेनें आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्याला आकाशांत ढग जमूं लागलेले पाहून कसा आनंद होतो ? तसाच आनंद जावजीला–त्या भाच्याला मामाच्या धीराच्या शब्दांपासून झाला.

जावजीनेंहि आपल्या मतें सावधगिरी राखून भीत-भीत-हळूच, मामा प्रसन्न आहेत अशी ती वेळ पाहून गोष्ट काढली.

"बरें, मग काय स्वतःची टाइप फाउंड्री काढायची म्हणतोस ?" मामा म्हणाले.

"होय मामा." जावजी उत्तरला.

"चांगला किफायतशीर आहे धंदा. उत्तम चालायला हरकत नाहीं. त्यासाठीं किमान किती भांडवल लागेल तुला ?"

"तोनशें रुपये पुरेत."

"ठीक आहे. करूं आपण लौकरच त्याची व्यवस्था. कांहीं काळजी करूं नकोस तूं. थोड्याच दिवसांत भागेल तुझी गरज. बाकीची सारी तयारी कर तूं." मामा म्हणाले.

जावजीला आकाशींचा चन्द्र हातीं आल्यासारखा आनंद झाला. तो त्या दिवसापासून पुढच्या तयारीला लागला. त्यानें काळबादेवीवर कोलभाट लेनमध्यें अगदीं बेताच्या भाड्याची लहानशी जागा भाड्यानें मिळविली. मामाला न कळत मामाच्या भरंवशावर भाडें देऊन जागा अडकवून देखील ठेवली.

"पुढच्या महिन्यापासून आपण नोकरी सोडणार," असें तो जिवाभावाच्या मित्रांपाशीं सगळें सांगून बोललाहि. अशी सारी तयारी जोरानें झाली.

पंधरा दिवस गेल्यावर जावजी मामांना पुढील तजविजीचें काय झालें म्हणून विचारायला गेला. मामा तेव्हां खुमाशेट मारवाड्याशीं व्यवहाराविषयीं कांहीं बोलत बसले होते.

"अरे जावजी! जमणें अवघड दिसतें काम. तारणाखेरीज पैसे द्यायला कोणी तयार नाहीं. आणि तुझ्यापाशीं तर तारण द्यायला कांहींच नाहीं. म्हणून सोडून दे तो नाद. आणि आपली नीट नोकरीच कर कशी!" अशीं त्या विषयावर बोलतां बोलतां भाच्याच्या तोंडाला पानें पुसून मामा मारवाड्यासह बाहेर निघून गेला.

मारवाडी जातां जातां पुन्हा पुन्हा निराशेनें बसलेल्या जावजीकडे वळून पहात होता. त्याची मारवाडी नजर खरी; पण तिच्यांतहि थोडा ओलावा होता.

## २ : जरा मागें वळून....

अशी एक लोककथा आहे कीं, एका पाण्यानें तुडुंब भरलेल्या सरोवरांत तहानेनें व्याकुळ झालेला एक प्राणी होता. त्याची मान आणि मुंडकी तेवढी नेहमीं पाण्यावर असायची. त्यानें पाणी प्यायला खालीं मान केली, कीं पाण्याची पातळी खाली जायची. जितकी मान त्यानें खालीं करावी, तितकें पाणी आपलें खालीं खालींच जायचें. त्या पाण्याचा एक थेंबहि त्या बिचाऱ्या प्राण्याच्या मुखीं लागायचा नाहीं; आणि पाण्यानें तुडुंब भरलेल्या सरोवरांत त्याची तहान कांहीं भागायची नाहीं.

पंचवीस वर्षांच्या तरण्याबांड, बुद्धिवान, कष्टाळू व महत्त्वाकांक्षी पण पापभीरु अशा जावजीची वरील लोककथेंतील प्राण्यासारखीच अवस्था होती.

तेव्हां तो एक अगदीं साधा, अगदीं सामान्य, यशोमंदिराचें शिखर गांठण्यासाठीं जिवापाड धडपडणारा जावजी दादाजी चौधरी होता. त्याचे दरमहा चार हजार रुपये पगार वांटणारे सुप्रसिद्ध छापखानेवाले श्रीमान शेठ जावजी दादाजी चौधरी, जे. पी. पुढें झाले.

हा पंचवीस वर्षांचा तरणाबांड जावजी दादाजी वयाच्या दहाव्या वर्षी दरमहा तब्बल तीन रुपये पगारावर मुंबईंतील अमेरिकन मिशन छापखान्यांत टाइपघांश्या पोऱ्या म्हणून रुजू झाला. तेव्हांपासून स्वतःच्या हिंमतीवर व स्वकष्टांनीं चांगले दिवस पाहण्याची अवघड वाटचाल करीत ऐन पंचविशीच्या उमेदीच्या उमरींत तो मुंबईंतीलच

'ओरिएंटल' छापखान्यांत दरमहा ३० रुपये पगारावर टाइप फाउंडर म्हणून चाकरीवर होता.

पंधरा वर्षांच्या अवधींत जावजी टाइपघांश्याचा टाइप फाउंडर अथवा कास्टर म्हणजे टाइपपाड्या झाला होता. दरमहा तीन रुपये पगारापासून तीस रुपये पगारापावेतोंची भाग्याची चढण तो प्रयत्नपूर्वक व हिंमतीनें चढला होता. महत्त्वाकांक्षा एकसारखी वाढत होती. त्याला हाताशीं धरून ती त्याला पुढें पुढें चालवीत होती. तिचें आणि त्याचें संगनमत झालें होतें. 'गड्या! आपणाला सारा जन्म 'केली चाकरी, पावला मुशाहिरा' असलें हातावरच्या पोटाचें कष्टाळू जीवन जगायचें नाहीं. आपणाला हिंमत आहे, बुद्धि आहे. गुण आपल्या अंगीं आहे. आपणाला स्वतःच्या मालकीचा उद्योगधंदा कां काढतां येऊं नये?'

यांत येऊन जाऊन अडे कुठें? तर पैसा! बुद्धिवान, कष्टाळू, महत्त्वाकांक्षी पण गोरगरीब हिंमतवान तरुण कामगाराची जी आजची अडचण, तीच तेव्हांचीहि. फरक असला तर एवढाच कीं, तेव्हां—म्हणजे मराठशाही बुडाली आणि भारतावर इंग्रजी साम्राज्यसत्ता दणक्यानें माजूं लागली तेव्हां—एकोणिसाव्या शतकांत शंभर वर्षांपूर्वी एकंदरींत सर्वच राहणीमान स्वस्ताईचें होतें. साध्या कामगाराला दरमहा २–३ रुपये पगार, आणि तोच चांगला कलावंत कारागीर कामगार झाला तेव्हां त्याला ३० रुपये पगार! हें जरी पगाराचें मान कमी, तरी राहणीचें

मानहि स्वस्ताईचें. आणि उद्योगधंद्यांना भांडवलहि बेताचें लागायचें.

जावजीला तेव्हां टाइप फाउंड्रीचा स्वतःचा धंदा काढण्यासाठीं हजारोंनीं भांडवल लागणार होतें, अशांतली गोष्ट नव्हे. तो स्वतः कामगार होता, कसबी होता. आपल्या धंद्यांत चांगला वाकबगार होता. कमी पैशांत काटकसरीनें धंदा कसा उभारावा, याची ठाम योजनाहि त्याच्यापाशीं बऱ्याच दिवसांपासून होती.

पण त्यासाठीं लागणारें कमींत कमी भांडवल मिळवायलाहि त्याला फार कष्ट पडत होते. त्याला पाय रोवतां येत नव्हता. कोणी साह्यकर्ता, पाठीराखा नाहीं; तोंच मामा मदत द्यायला उभा राहिला म्हणून त्याला केवढी आशा वाटली ! त्या आशेची ही अखेर अशी निराशा झाली.

"मोठ्या आशेनें मीं मामांपाशीं आ पघळला. पण मामांनीं तोंडांत घांसभर अन्न न भरवतां फुफाटच्यांतली मूठभर कढत राख माझ्या तोंडांत कोंबली !" अशा विषण्ण भावनेनें हळहळत, कळवळत, स्वतःच स्वतःशीं चूर होत जावजी मुकाटपणें उमरखडीला आपल्या घराकडे चालला. त्याला ही निराशा पदरीं घेऊन घरीं जावेंसें वाटेना. पाय जड पडत होते. पण अशा वेळीं घरीं नाहीं तर दुसऱ्या कुठें जायचें ? दुसरा कोण कुठें आसरा देणार ?

## ३ : पूर्ववृत्त

मुंबईंत उमरखाडींत जावजी दादाजींचें घर होतें असें आपण म्हणतों. पण मुंबई हें कांहीं त्या चौधरी घराण्याचें

कुलस्थान नव्हे. हे चौधरी मूळचे राहणारे शहापुर तालुक्यांतील विडें गांवचे. तेथून जावजींचे पणजे जावबा चौधरी पोटाच्या पाठीं लागून मुंबईंत आले. आणि उमरखडींत बिऱ्हाड थाटून राहूं लागले. मग तिथें त्यांचें स्वतःचें लहानसें राहतें घरहि झालें. तेव्हांच्या अपार स्वस्ताईच्या काळांत लहानशा घराला फार काय लागतें ?

जावबांचा मुलगा पदाजी. त्यांचे जावजी दादाजी हे नातु. त्याच घरांत जावजींचा १८३९ सालीं जन्म झाला. पिकलेल्या कलमी हापुस आंब्याचीहि कैरी आंबट असते ना ? तसाच जावजी हा मुलगा लहानपणीं फार हूड आणि उनाड. तेव्हां शिक्षणाची सोयहि चांगली नव्हती; आणि त्या घरांत तेव्हां पुस्तकी शिक्षणाला महत्त्वहि नव्हतें. तशांत हा मुलगा शिकण्यापेक्षां उनाडक्या करण्यांतच रमायचा. त्यामुळें लहानपणीं शिक्षण बेताचेंच झालें. म्हणजे किती ? तर कावळ्याच्या पायांसारखी जेमतेम सही करण्यापुरतें.

पण तेवढ्या ज्ञानाच्या भांडवलावर हा मुलगा मुंबईंतील अमेरिकन मिशन छापखान्यांत टाइपांचे खिळे (ठसे) घांसून साफसूफ करण्याच्या कामावर नोकरीस लागला. तिथें त्याची तब्बल दहा वर्षें नोकरी झाली. तेवढ्या काळांत त्याचा पगार वाढतां-वाढतां दरमहा ७ रुपयांपावेतों वाढला.

पुढें तो छापखाना मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' नें विकत घेतला. तरीहि जावजी नोकर तिथेंच, त्याच

कामावर. त्याचा पगार मात्र १० रुपये झाला. तिथून मग त्यानें इंदुप्रकाश छापखान्यांत नोकरी धरली, तिथें पगार मिळूं लागला १३ रुपये. दीड वर्षांत पगार १५ रुपये झाला.

परंतु असा पगार वाढत होता, त्यापेक्षांहि आपली पात्रता अधिक झपाटयानें वाढत असल्याची जाणीव जावजींना होत होती. त्या जाणिवेनेंच तर ते इथवर चढत आले होते. ते तशीच आणखी एक वरची पायरी चढले. त्यांनीं पाहिलें, ओरिएंटल प्रेसमध्यें चांगला कास्टर हवा आहे. आपण चांगले कसबी कामगार आहों याची त्यांना स्वतःला खात्री होती. तसाच ओरिएंटल प्रेसपावेतों काम-गारा कामगारांतून त्यांचा लौकिकहि अगोदरच गेला होता. ते तिथें नोकरी मागायला गेले. ताबडतोब दरमहा ३० रुपये पगारावर त्यांना टाइप पाडण्याच्या कामावर नोकरी मिळाली.

असा पगार वाढूं लागला. कामाचा बोलबाला होऊं लागला. जावजींच्या कामाची छापखान्याच्या जगांत सगळीकडे वाहवा होऊं लागली. तेव्हां जावजींनाहि वाटूं लागलें, 'असें पोटासाठीं लोकांच्या कामाचे गाडे उपसत किती दिवस बसायचें ? त्यापेक्षां स्वतःच स्वतःचा धंदा काढला तर ? आपणाला चांगला नांवलौकिक आहे. आपण टाइप तयार केला तर गिऱ्हाईक हवें तेवढें मिळेल.'

—त्याला किमान ७०० रुपये भांडवल मात्र हवें. ते भांडवल मामाकडून मिळणार, मिळणार, अशा आशेवर

बाकीचा सारा मांड जावजी मोठ्या हुरूपानें मांडीत सुटले होते.

आणि शेवटीं पाहतात तों मामाच्या भरंवशाच्या म्हशीला टोणगा झाला ! तें आपण मागें पाहिलेंच.

आतां पुढें काय करायचें ?

असा विचार करीत जावजी कपाळाला हात लावून घराकडे गेले. ते दाराच्या आंत पाऊल टाकणार, तोंच मागाहून त्यांना हांक ऐकूं आली, "जावजी !"

मागें वळून पाहतात तो खुमाशेट हांक मारीत पाठीमागें उभे !

### ४ : खुमाशेट प्रसन्न झाले

"या शेटजी !" खुमाशेटजींचें हंसतमुखानें आदरातिथ्य करीत जावजी आंत जातां जातां म्हणाले.

"काय बेत आहे ?" ओसरीवर बैठकीवर तक्क्याशीं टेकून बसतां बसतां खुमाशेट म्हणाले, "काय म्हणत होते मामा ?"

"मला लहानसा टाइपांचा कारखाना काढायला कर्ज हवें होतें. तें मामा मिळवून देतों म्हणाले होते. म्हणून ते म्हणाले तशी मी सगळी तयारी करून गेलों. तों आतां तारणाखेरीज सावकार कर्ज देत नाहीं म्हणतात. गरीब माणूस मी. मीं तारण काय लावून देऊं ? मनांतलें जमायचा योग नाहीं म्हणायचें झालें—" बैठकीवर बसल्या बसल्या जावजी म्हणाले.

"अरे, डरूं नये असें माणसानें. हिंमत मर्दा तो मदत खुदा. काय तुझी योजना आहे मला सांग तर खरी समजावून."

जावजींना तो सावकार 'सावकार' असला तरी बऱ्या स्वभावाचा आहे हें माहीत होतें. आणि आपण एक हुषार कर्ते तरुण आहोंत असा त्याचा समज असल्याचेंहि त्यांच्या कानीं आलें होतें. त्यांनीं त्या संधीचा पुरेपूर फायदा घेतला. टाइपाला एकूण खर्च किती येतो, विक्रीचे दर काय, निवळ नफा चोख काम करूनहि किती होतो; हें सारें अगदीं खरेंखरें त्यांनीं त्याला नीट समजावून सांगितलें. बरें, काटकसरीनें धंदा उभारला तर ७०० रुपये भांडवल आपणाला कसें पुरतें हेंहि प्रमाणांनीं सिद्ध करून त्यांनीं पटवून दिलें.

खुमाशेटची त्यावरून एवढी खात्री होऊन चुकली कीं, 'आपण या तरुणाला पतीवर भांडवल दिलें तरी बुडणार नाहीं. कारण कामगार नेकीचा. आपल्या कामांत वाकबगार. आजवर लहाणपणापासून अनेक छापखान्यांत काम करतां करतां धंद्यांतील साऱ्या खांचाखोंचा त्याला चांगल्या माहीत झालेल्या. आपणाला आपल्या भांडवलावर निर्वेध व्याज मिळेल. धंदा चांगला चालवून त्यालाहि नशीब काढतां येईल.'

"बस. मी देतों तुला ७०० रुपये तुझ्या पतीवर. पेढीवर येऊन घेऊन जा. धंदा कर आणि नशीब काढ." खुमाशेट जावजींना म्हणाले.

त्यासरसा पायांतील सेवावृत्तीच्या—चाकरीच्या शृंखला खळ्‌कन तुटल्याचा गोड आवाज जावजींच्या अंतर्मनांत निनादूं लागला. १८६४ सालचा तो दिवस त्यांच्या भाग्योदयाचा उगवला.

त्यांचें काम झालें.

## ५ : सतत पुढें पाऊल

कोलभाट लेनमध्यें जावजींनीं लहानशी, बेतशीर व सोईस्कर जागा अगोदरच हेरून ठेविली होती. त्या जागेंत एके दिवशीं शुभमुहूर्तावर खुमाशेटच्या कृपेनें जावजींची टाईप फाउंड्री सुरू झाली.

आपला हात जगन्नाथ म्हणतात तसे जावजी. टाइप पाडण्याची कला म्हणजे त्यांच्या तळहाताचा मळ. तयार मालाला गिऱ्हाईकहि चांगलें मिळूं लागलें. कारखाना दिवसेंदिवस चांगला भर-भराटूं लागला. हातचें कसब वाणी गोड. वागणें नेकीचें. मग जम बसायला काय उशीर? मदत करणाऱ्या भल्या लोकांचीहि आपोआप जोड मिळूं लागली. अडीअडचणी जाणवण्याची वेळच येईनाशी झाली. आणि धंदा चांगला चालूं लागल्यावर अडीअडचणी आडव्या येतात तरी कशाला? त्या देखील आपली उठबस कुठें होईल, पगडा कुठें बसवतां येईल, याचा विचार करतातच कीं!

थोडयाच दिवसांत जावजीशेटनीं खुमाशेटचें ७०० रुपयांचें कर्ज सव्याज फेडून टाकलें. आणि त्या व्यवहारांत

कर्जापेक्षां कितीतरी पट मोलाचा भलेपणा आयता कायमचा जोडला गेला.

टाइपांचा कारखाना भरभराटत गेला. पण जावजी-शेटची वृत्ति नम्र, कष्टाळु आणि एक प्रकारच्या मधुर असंतोषानें भारावलेली. तो असंतोष असा कीं, आपल्या कारखान्यांतला टाइप सारे लोक वाखाणतात त्यापेक्षां अधिकाधिक चांगला निपजला पाहिजे. गिऱ्हाइकाला वाढता संतोष होऊन त्याला ती वाखाणणी अवीट वाटली पाहिजे.

त्यांनीं हेरलें होतें, कीं मुंबईंत नवे नवे मनपसंत टाइप कोरणारे व करणारे कलावंत गुणी दोघे. एक टामस ग्रॅहॅम आणि दुसरा जीवन वल्लभ लोहार.

'बस्स, या दोघांना आपण जवळ केलें पाहिजे.' जावजीशेटच्या मनानें घेतलें. आणि त्यांनीं योग्य मुशाहिरा देण्याचें कबूल करून त्या दोघांकडून आपल्या फाउंड्रीसाठीं गुजराथी व मराठी टाइपांचे सांचे करून घेतले. त्यामुळें टाइप अधिक सुबक निपजूं लागला. तो लोकांना अधिक आवडूं लागला. गिऱ्हाईक वाढूं लागलें. धंदा भर-भराटूं लागला.

याच सुमाराला जावजीशेटना त्यांच्या व्यवसायांत अजोड व अमोल असें आणखी एक रत्न लाभलें. राणू रावजी आरू हा जावजींसारखाच बुद्धिवान व कष्टाळु माणूस. मूर्तीबरोबर सावली चालते, तशी जावजींबरोबर जी त्यांच्या व्यवसायांतली मंडळी लोभानें आली, त्यांतला रामू रावजी आरू हा एक. अगदीं उपजतच म्हणण्याजोगा

कलावंत खरा तो. आरूचा हात टाइपांचे सांचे करतांना, अक्षरें कोरतांना फार सफाईनें चालायचा. निर्णयसागर छापखान्याची टाइपांच्या सुबकपणाच्या बाबतींत जी तेव्हांपासून चिरंजीव ख्याति आहे, तिचा मोठा वांटा ओघानेंच आरूकडे जातो. याचेंहि शिक्षण जावजींइतकेंच; किंबहुना त्याहूनहि कमी. पण अक्षरें सांच्यासाठीं कोरायचा तीं अशीं सुबक कीं पाहणाराची दृष्ट लागावी !

अशी टाइप फाउंड्रीची दिवसेंदिवस वाढ होत गेली. तीच 'जावजी दादाजी टाइप फाउंड्री.' जम चांगला बसला. पण तेवढ्यावरहि जावजीशेट समाधान मानून स्वस्थ बसणारे नव्हते. त्यांना नव्या नव्या साहसाचे पुढचे विचार सुचूं लागले.

"टाइप हा छापखान्याचा प्राण. तें बळ पुरेपुर आपणापाशीं आहे. आतां आपण छापखानाहि काढून आणखी एक पुढें पाऊल टाकायला कसली हरकत आहे ?" त्यांचें मन बोलूं लागलें.

## ६ : निर्णयसागर छापखाना

जावजीशेटनीं छापखाना काढण्याचें मनांत आणलें. आणि सारी जुळवाजुळव करून सन १८६९ सालीं छापखाना उभारलाहि. त्याला चांगली किंमत आली म्हणून तो कमळाजी गौराजी या गृहस्थांना विकून टाकला. परंतु मनांतली ऊर्मि सदाफुलीसारखी टवटवीत होती.

कांहीं दिवसांनीं वेदशास्त्रसंपन्न विठ्ठल सखाराम अग्निहोत्री पंचांगवाले यांची अचानक गांठ पडली.

"हें पाहा जावजी ! छापखाना जर काढीत असलां, आणि बारा पानी सांच्यांत माझें पंचांग छापून द्यायला तयार असलां, तर आपण छापखान्यासाठीं ५०० रुपये भांडवल एका मुठीनें आगाऊ द्यायला तयार आहों." शास्त्रीबुवांनीं सांगितलें.

पंचांगाचें काम किचकट. नीट झालें तर बरें. तरी पण जावजीशेटनीं होकार दिला. ते म्हणाले, "नवा टाइप पाडतों. आणि नमुन्याचें एक पान करून छापून दाखवितों, पसंत पडतें का पाहा."

त्याप्रमाणें नवा टाइप पाडला. नमुन्याचें पान रचून तयार केलें. दुसरीकडून मुद्रित (प्रुफ) काढून शास्त्रीबुवांना दाखविलें. त्यांना तें एकदम पसंत पडलें. लगेच कबूल केलेले पैसे हातीं आले. आणि शास्त्रीबुवांचें पंचांग छापण्याच्या निमित्तानें छापखाना निघाला. तोच मुंबईचा सुप्रसिद्ध 'निर्णयसागर छापखाना.'

टाइप फाउंड्रीपाठोपाठ असा एकदां छापखाना निघाल्यावर वडाच्या पारंब्यांसारखी त्याचीहि वाढ होऊं लागली. छापखान्यासाठीं नवे नवे सुबक टाइप तयार होऊं लागले. विलायतेहून टाइप पाडण्याचें नवें मशीन (यंत्र) आलें. इंग्रजी टाइपांच्या नवा मेट्रिसा (सांचे) आल्या. व्याप वाढूं लागला. वाढत्या व्यापाला जागा अपुरी पडूं लागली.

मग जावजीशेटनीं ग्रँटरोडवर दुसरी नवी जागा भाड्यानें घेतली. अशी जागेची अडचण मिटल्यावर छाप-खान्याची सर्व बाजूंनीं अविरोध वाढ होऊं लागली.

वाढीबरोबर छापखान्यांत सुधारणाहि नव्या होऊं लागल्या. टाइप अधिक सुधारले. सुधारलेले आणखी नवे टाइप तयार झाले. इंग्रजी, मराठी, गुजराती अशा अनेक भाषांचे टाईप नवे नवे निपजूं लागले.

आतां एक नवीच गोष्ट अलीकडे जावजीशेटच्या मनांत गुणगणूं लागली होती. "यंत्रेंच आम्ही विलायतेंतून आणतों. तीं आम्हांला इथल्या इथें कां करतां येऊं नयेत?"

हा प्रश्न जावजींच्या मनांत उभा राहिला मात्र. आणि लगेच तो सोडवायला सुरुवात झाली. यंत्रांचे इंग्रजी कॅटलॉग आणावे. आणि त्यांतील यंत्रांच्या चित्रांच्या मोडीवरून मननपूर्वक अभ्यास करावा. वाचायची तर बातच नको. जिथें धड मराठीहि वाचण्याची मारामार तिथें इंग्रजी कॅटलॉग काय वाचणार! केवळ निरीक्षण. तें पाहून कांहीं व्यवसायी मंडळींना उगीच भय वाटावें कीं, जावजीशेट परदेशी कंपन्यांच्या पेटंट हक्कांचा भंग करतात कीं काय!

जावजी दादाजींचा मराठी टाइप जसा लोकप्रिय झाला, तसाच इंग्रजी टाइपहि लोकप्रिय झाला. गोऱ्या लोकां-कडूनहि वाखाणणी होऊं लागली. 'अकाडेमी' या इंग्रजी साप्ताहिकांत कर्नल जी. ए. जेकब यांनीं मुक्तकंठानें लेख लिहून प्रशंसा केली. "मुंबईच्या निर्णयसागर छापखान्यांत

जावजी दादाजी यांनीं संस्कृत पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं, तीं खरोखरच प्रेक्षणीय आहेत. तितके उत्तम ठसे आजवर जगांत दुसरीकडे कुठेंहि कुणालाहि करतां आलेले नाहींत."

असा छापखाना, फाउंड्री—सारा कारखाना खूपखूप वाढला. त्यांतहि मौज ही कीं, कारखान्याच्या आयुष्यांत जावजी दादाजींच्या हयातींत जेव्हां पहावा तेव्हां आपला शुक्लपक्ष. छापखाना सर्वतोपरी वाढला. तो एवढा कीं, आतां तिथें ४००।५०० माणसें काम करूं लागलीं. महिना तब्बल तीन रुपये पगार मिळविणाऱ्या या एका माणसानें स्वतःच्या हिंमतीवर एवढा मोठा कारखान्याचा पसारा उभारला कीं, आरंभीं दरमहा तीन रुपये पगार घेणारा जावजी आतां जावजीशेट होऊन त्याच हातानें छापखान्यांत दरमहा चार हजार रुपये पगार वाटूं लागले.

उद्योगशीलता, चोख व वक्तशीर काम, नोकरांविषयीं सहानुभूति आणि प्रगतीच्या व सुधारणेच्या वाटेनें सदा वाटचाल हें जावजी दादाजी यांच्या औद्योगिक भरभराटीला पावणारें पंचायतन होतें.

तसें अगदीं कांटेकोरपणें बोलायचें झालें, तर जावजी दादाजी हे कांहीं मराठी मुद्रणकलेचे आद्य प्रणेते नव्हते. खऱ्या अर्थानें पाहतां मुद्रणकला ही मूळ भारताची कला नव्हे. या कलेचा शोध लागला चीनमध्यें. तेथून देशदेशांतरांचा प्रवास करीत ही कला चौदाव्या शतकाच्या अखेरीला पोर्तुगीज मिशनऱ्यांबरोबर भारतांत आली. पोर्तुगीज मिशनरी भारतांत राज्यस्थापनेसाठीं येवोत, कीं

व्यापारासाठीं येवोत, कीं ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठीं येवोत. ते जे आले, ते बरोबर ही कला घेऊन आले.

आणि असें सांगतात कीं, भारतांतील देशी भाषेंतील पहिलें पुस्तक 'मराठींतील सेंट पिटर्सचें चरित्र' हें एस्टे-व्हओ-द-कूझ यानें लिहिलेलें व छापलेलें पहिलें पुस्तक होय. भारतांत ग्रंथमुद्रणाचा अग्रमान याप्रमाणें मराठीला मिळालेला आहे. मात्र हें पहिलें मराठी पुस्तक खिळा-प्रेसवर (टाइप) छापलेलें होतें, कीं शिळाप्रेसवर छापलें होतें, हें नक्की सांगतां येत नाहीं. परंतु बहुधा तें शिळा-प्रेसवरच छापलेलें असावें.

**७ : गणपत कृष्णाजी**

मराठी मुद्रणांतील जावजी दादाजींसारखेच थोर, कल्पक व उद्योगी पुरुष म्हणजे गणपत कृष्णाजी हे होत. हा पाहूं जातां कोळी-भंडारी जातीचा एक अशिक्षित माणूस. जावजी दादाजींसारखाच. साधा पोटार्थी गरीब मजूर. मुंबईंत मिशनऱ्यांच्या छापखान्यांत दरमहा २ रुपये पगारावर खिळेघांश्याची चाकरी करणारा.

पण हा माणूस वरून दिसायला जरी सामान्य अशि-क्षित मजूर तरी, अंतरंगांत जावजी दादाजींसारखेंच हेंदेखील झांकलें माणिक होतें. तसाच कष्टाळुपणा, तशीच धडपड, तसाच चौकसपणा तशीच 'कांहीं तरी चांगलें नवें' करण्याची अंतरींची जबरी ओढ. जावजींचा कल जसा टाइप फाउंड्रीकडे, तसा या थोर माणसाचा कल छापण्याच्या यंत्रांकडे.

खिळेघांशी करतां करतां स्वारीनें एके दिवशीं अमेरिकन मराठी मिशनचा शिळाप्रेस पाहिला. त्याबरोबर त्याच्या मनानें घेतलें, "बस्स. आपणहि असा शिळाप्रेस काढायचा."

शिळाप्रेसला शाई हवी. तीहि पाहून पाहून युक्तीनें तयार केली. प्रथम लांकडी प्रेस तयार करून पाहिला. मग लोखंडी शिळाप्रेस विकत घेतला. तोच तो गणपत कृष्णाजीचा छापखाना. १८३१ सालची ती गोष्ट. त्या सालचें पंचांग त्या शिळाप्रेसवर छापलें. तेंच पहिलें मराठी छापील पंचांग. शिळाप्रेसवर छापलेलें. तोंवर तें कोणालाहि माहीत नव्हतें.

नंतर दहा वर्षांनीं गणपत कृष्णाजींनीं टाइपांचा छापखाना काढला. मग टाइप फाउंड्रीहि काढली. शिळाप्रेस व खिळाप्रेस अशा दोन्ही छापखान्यांतून दोन्ही प्रकारचीं हजारों पुस्तकें गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापून निघालीं. यापूर्वी १८३८ सालीं प्रसिद्ध दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचें मराठी व्याकरणहि याच शिळाप्रेसांत छापलें होतें.

परंतु योगायोग असा कीं, पुढें गणपत कृष्णाजीहि १८६० सालीं वारले; आणि त्यांच्या आगेंमागें त्यांच्या छापखान्याचाहि अस्त झाला.

म्हणूनच कालानुक्रमानें या मराठी क्षेत्रांत अग्रपूजेचा मान जरी गणपत कृष्णाजींचा, तरी कार्याच्या चिरस्थायी महत्त्वाच्या दृष्टीनें तो मान जावजी दादाजींनीं स्वतःच्या

प्रयत्नशील कर्तबगारीनें स्वतःकडे खेंचून घेतला व अखेर-पावेतों टिकवला.

परंतु यांत केवळ योगायोगापेक्षां प्रत्यक्ष वस्तुस्थिति कौतुक करण्याजोगी होती. ती अशी कीं, मराठी मुद्रण व्यवसायांत पहिलीं यशस्वी मराठी पावलें टाकणारे गणपत कृष्णाजी आणि त्यानंतरचे जावजी दादाजी हे दोघेहि जेमतेम वेडीवांकडी सही करण्याइतपत––मुळाक्षरें व कांहींशा बाराखड्या शिकलेले मागासलेले मोल-मजूर होते. मातींतून फुलें फुलतात, तीं अशीं !

**८ : जावजी दादाजींचें वैशिष्टच**

सर्वांगपरिपूर्ण आदर्शवत् निर्णयसागर छापखाना व टाइप फाउंड्री ही जावजी दादाजींची असाधारण महनीय ऐतिहासिक कामगिरी तर खरीच. आजवर देखील मराठी ठशापुरता विचार करतां जावजी दादाजींच्या छाप-खान्याचो व टाइप फाउंड्रीची यशस्वी बरोबरी करणाऱ्या कारखाने-संस्था महाराष्ट्रांत तरी निघाल्या नसतील. कांहीं काळापूर्वीपावेतों तर ग्रंथाच्या बाह्यांगाची बिनतोड प्रशंसा ग्राहकाच्या मनींमानसीं ठसविण्यासाठीं 'छपाई निर्णयसागरची' असें प्रकाशक जाहिरातींत छापीत.

मुद्रा अथवा छपाई यांचा उत्कृष्टपणा हे दोन विशेष जावजी दादाजींनीं स्वतःला ऊर्जितावस्थेला आणणाऱ्या व स्वकष्टानें भूषविलेल्या मुद्रण-कारखानदारींत तर होतेच. परंतु तेवढें सांगून भागणार नाहीं. आजकाल सरकारी कायदेकानूंनीं निर्माण केलेले मुद्रण व्यवसायविषयक नियम

तेव्हां नव्हते. असे कायदेहि नव्हते. अशा वेळींहि जावजी दादाजींनीं स्वतःच स्वतःला आपल्या व्यवसायासाठीं कांहीं औचित्यपूर्ण निर्बंध घालून घेतले होते. आपल्या कारखान्यांतील नोकरांविषयीं कनवाळू समतावृत्ति, गिऱ्हाइकाचा संतोष आणि अकारण कडूपणाची दक्षतापूर्वक टाळाटाळ हे त्यांच्या स्वयंमान्य निर्बंधांपैकीं तीन ठळक निर्बंध होत. आणि हे निर्बंधहि केवळ सरकारी अंमलदार कारखाना पाहायला येईल तेव्हां त्याला कायद्याप्रमाणें दिसावे अशा धोरणानें चिकटवून लटकवलेले नव्हते. कदाचित तेव्हांच्या छापखान्यांत अशा देखाव्याची कायदेशीर आवश्यकता निर्माण झाली नसेल हें निराळें. तथापि या सर्व नियमांतला व कायद्यांतला व सर्व कायद्यांतला मोठ्यांतला मोठा व पवित्रांतला पवित्र असा माणुसकीचा कायदा निष्ठेनें पाळणारे जावजी दादाजी हे एक खरे माणूस होते.

त्यांच्या कारखान्यांत अनेक वेळां नोकर-चाकरांवर आपत्ति यायच्या. अशा प्रत्येक वेळीं मुख्यतः गोरगरिबांचें अडायचें पैशासाठीं. अशा अडल्या-नडल्यांना सक्रिय धीर द्यायला जावजीशेटजींचा वरदहस्त नेहमीं तत्पर असायचा.

अशा अनेक उदाहरणांपैकीं एक : छापखान्यांतील एक कंपॉझिटर आजारी पडून मयत झाला. त्याच्या पगारापैकीं थोडी बाकी शिल्लक होती, ती मागायला त्या कंपॉझिटरचा म्हातारा ६०।६५ वर्षांचा बाप छापखान्यांत आला. बिचारा जख्ख म्हातारा. एकुलता एक मुलगा त्याचा घरांतील कर्ता. त्याला देवानें आपणाकडे ओढून नेलें.

तरी म्हाताऱ्यानें कांहींच अधिक मागितलें नाहीं कीं अधिक सांगितलें नाहीं. मागणार कोणत्या तोंडानें ? जेवढा पगार येणें बाकी होता तेवढा येतांक्षणीं बिनतक्रार मिळतो आहे यांतच त्याला विरंगुळा होता. याहून अधिक कोणी कारखानदार मालक करीत नाहींत; आणि असे गरीब लोक तशी कोणा मालकांपासून अपेक्षाहि करीत नाहींत.

जावजीशेट जवळ बसून सारें पहात होते. कारकून हिशेब करून मयत कंपॉझिटरचा चुकता पगार त्याच्या म्हाताऱ्याला मोजून देऊं लागला. तें पाहून त्यांनीं कारकुनाला सांगितलें, "अहो, त्यांना एका पुऱ्या महिन्याचा अधिक पगार द्या."

आणखी एक उदाहरण : छापखान्यांतले कारकून विष्णुपंत गोखले वारले. गरीब ब्राह्मण. अंत्यविधीला पुरेसा पैसा घरांत गांठीला असेल कीं नाहीं याची वानवा. शिवाय तेव्हां पाऊस मुसळधार ओतत होता. अशा अडचणीच्या वेळीं गरिबांच्या अडीअडचणींकडे कानाडोळा करण्याची समाजाची सर्वसाधारण रीत असली तर त्याबद्दल कोणाला फारसा दोष देतां येणार नाहीं. पण जावजीशेटजींना ही आपल्या कारकुनाची सारी परिस्थिति माहीत. ते प्रसंग ओळखून स्वतः तिकडे गेले आणि सगळचा अडचणी निभावून कारकुनाचा अंत्यविधि त्यांनीं अगदीं यथासांग पार पाडला.

बरें; तो छापखान्यांतला कारकून, म्हणून त्याच्याकडे जावजीशेटजींनीं इतकें कळकळीनें लक्ष दिलें असें नव्हे.

गोरगरिबांना मुंबईंत विशेषत: अंत्यविधीच्या बाबतींत अशा अडचणी नाडतात हें त्यांना माहीत होतें. त्यामुळें ते अशा प्रसंगाच्या वेळीं कुणालाहि होईल तें साह्य करायला उभे असायचे.

आणखी एका कारकुनाची छापखान्यांतून एका मोठ्या सरकारी कामाचा खर्चाचा लेखी अंदाज देतांना मोठी चूक झाली. त्या चुकीबद्दल छापखान्याला २००० रुपये तोटा सोसण्याची पाळी आली. कारण सरकारनें जें अंदाजपत्रक मान्य केलें, तें छापखान्याच्या चुकीमुळें २००० रुपयांनीं कमी. पण या उदारात्म्यानें त्या कारकुनाला त्याबद्दल रागावूनहि मानसिक शिक्षा देखील केली नाहीं. मुकाटपणें तो तोटा सोसला.

कोणीं याविषयीं विचारी तेव्हां जावजी म्हणत, "अहो, समजा, माझ्याच हातून ही चूक झाली असती तर? माणूस आहे तिथें चूक ही व्हायचीच."

## ९ : मुद्रण व्यवसायांतील नीतिधर्म

जावजी दादाजी आपल्या कारखान्यांतील नोकर-चाकरांविषयीं कनवाळु, तसेच छापखान्याचा नांवलौकिक आणि गिऱ्हाइकाचा संतोष याला अगदीं डोळ्यांत तेल घालून जपणारे होते. छापखान्याचें नांव जाईल अशी कोणतीहि गोष्ट जशी नोकरांकडून घडूं नये अशी त्यांची अपेक्षा, तशीच छापखान्यांतील शिस्तहि इतकी चोख कीं, कामांत हलगर्जीपणा जरा देखील होतां कामा नये. जरा

देखील गिऱ्हाइकाचें काम जरी बिघडलें, तरी तें रद्द करून तोटा आपण म्हणजे छापखान्यानें सोसावा. आणि गिऱ्हाइकाला नवें चोख काम करून द्यावें.

धंदा म्हटला, कीं तो गिऱ्हाइकांच्याच जिवावर चालणार. गिऱ्हाइकांना नाराज करून कसा पल्ला येणार ? जावजीशेटजी गिऱ्हाइकाशीं अतिशय सौजन्यानें वागायचे. पण असें असतांना देखील एकदां एका बड्या गिऱ्हाइकाला नाराज करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला.

ते तेव्हां आजारी होते. ख्रिस्त मंडळाचीं पुस्तकें त्यांच्या छापखान्यांत छापत. दरहि चांगला मिळे. बरें, पैशाविषयीं कधीं घासाघीस अगर दिरंगाई नाहीं. अशीं गिऱ्हाइकें टिकवून धरावींशीं कोणत्या छापखानेवाल्याला वाटणार नाहीं ? जावजीशेटजींनाहि तसें वाटे.

परंतु एकदां जावजीशेट आजारी होते. अशा वेळीं ख्रिस्तमंडळाचें कांहीं काम छपाईला आलें. तें नेहमींप्रमाणें छापून दिलेंहि गेलें. पुस्तक प्रसिद्धहि झालें. थोड्या दिवसांनीं त्या पुस्तकावर जेव्हां टीकेची झोड उठली, तेव्हां अनेकांच्या ध्यानीं आलें कीं, त्यांत हिंदु समाजाच्या धर्मभावना दुखविणारा भडक मजकूर आलेला आहे !

त्या पुस्तकावर व त्याबरोबर छापखान्यावरहि हिंदुजनांच्या प्रखर टीकेचें जोराचें काहूर उठलें. शेवटीं जावजीशेटनीं असें पुस्तक आपल्या छापखान्यांत छापलें गेल्याबद्दल उघडपणें माफी मागितली. आणि ख्रिस्तमंडळाच्या लोकांना स्पष्ट सांगून टाकलें, "कुणाहि

व्यक्तीची, धर्माची अगर कशाचीहि निंदा असलेलें तुमचें पुस्तक मी माझ्या छापखान्यांत छापून देणार नाहीं. तसें कांहीं छापायला देऊं नका."

अशा स्पष्टवक्तेपणाबद्दल जावजी शेटजींना तें बडें गिऱ्हाईक अखेर गमावून बसावें लागलें. सालीना २-३ हजार रुपये मिळवून देणारें काम हातचें गेलें. परंतु त्या मोहाला बळी पडून ते आपल्या कर्तव्याला चुकले नाहींत.

तेव्हांपासून त्यांनीं छापखान्याच्या कामाविषयीं नियमच ठरवून टाकला–"ज्यांत सरकारविरुद्ध मजकूर असेल, कोणत्याहि धर्माविरुद्ध अगर व्यक्तीविरुद्ध मजकूर असेल, अथवा बीभत्स मजकूर असेल, असें कोणतेंहि छपाईचें काम आपल्या छापखान्यांत छापलें जाणार नाहीं."

आपल्या छापखान्यांत केवळ उत्कृष्ट छपाई व्हावी, एवढ्यावरच जावजीशेट संतुष्ट नव्हते. चांगलीं प्रकाशनें छापखान्यानें प्रसिद्ध करावीं असाहि त्यांचा प्रयत्न असे. 'काव्यमाला', 'काव्यसंग्रह' हीं मौलिक प्रकाशनें याच उदात्त हेतूनें प्रेरित होऊन त्यांनीं प्रकाशनाला घेतलीं होतीं. त्यांत त्यांना खूप तोटा सोसावा लागे, पण त्याचें त्यांना कांहीं वाटत नसे.

कांहीं नामांकित ग्रंथहि त्यांनीं प्रसिद्ध करावे व त्यांत त्यांना कधींकधीं चांगलीच खोट यायची, तीहि त्यांनीं अगदीं खेळीमेळीनें सहन करावी. वेदशास्त्रसंपन्न गणेश-शास्त्री लेले यांनीं 'रघुवंश' या कालिदासाच्या संस्कृत काव्याचें भाषांतर केलें. दक्षिणा प्राइझ कमेटीनें त्या

पुस्तकाची खूप प्रशंसा करून त्याला ५०० रुपये पारितोषिक दिलें. इतका चांगला ग्रंथ, म्हणून जावजीशेटनीं त्याचे हक्क विकत घेऊन तो छापला. परंतु त्या बाबतींत त्यांचे सर्वच अंदाज सपशेल चुकले. नऊ वर्षांत त्या ग्रंथाच्या शेंदीडशेंहि प्रती खपल्या नाहींत. परंतु त्या थोर गृहस्थानें त्या व्यवहाराबाबत निरुत्साहाचा शब्दहि कधीं कोणापाशीं मुखावाटे काढला नाहीं.

तथापि, मराठी भाषेचा उत्कर्ष व्हावा व लोकांना बोध आणि मनोरंजन अल्पमोली बहुगुणी असें लाभावें, या दृष्टीनें जावजीशेटनीं केलेला एक 'बालबोध' प्रयत्न मात्र सर्वतोपरी चांगलाच यशस्वी झाला.

**१० : बालबोध**

'बालबोध' बाल-मासिक लहानसेंच, परंतु अल्पमोली बहुगुणी असें व आपल्या नांवाला साजेसें. जावजी दादाजींनीं कै० विनायक कोंडदेव ओक याच्या संपादकीय सहकार्यानें १८८१ सालीं तें काढलें. त्याला आरंभापासूनच चांगले वर्गणीदार मिळत गेले. माजी बडोदानरेश कै० सयाजीराव गायकवाड हेहि 'बालबोध'च्या आरंभींच्या वर्गणीदारांत होते. तो मराठी मासिकांचा आरंभकाल होता असें म्हटलें तरी चालेल.

थोड्याच वर्षांत 'बालबोध'चा चांगला बोलबाला झाला. त्याच्या लोकप्रियतेचें एक गमक म्हणजे श्री. सयाजीराव महाराज यांच्याकडून त्याची झालेली प्रशस्ति व

सक्रिय पुरस्कार आणि त्यांतून निर्माण झालेली एक उल्हासकारक मौज.

सन १८८३ सालची ती गोष्ट. एके दिवशीं सयाजीराव महाराजांच्या कचेरींतून 'बालबोध' ला एक खलिता आला.

'राजमान्य राजश्री बालबोध पुस्तकाचे मॅनेजर, मुक्काम मुंबई यांसी,

सलाम दिगर. आपले बालबोध पुस्तका-संबंधानें श्रीमंत महाराजसाहेब यांचे उद्गार निघाले ते. "....'बालबोध' पुस्तकाची भाषा सरळ असून त्यांतील शब्दरचना विचारपूर्वक केलेली असते. मुलांना पुस्तक असावें तसें हें पुस्तक आहे. याकामीं ग्रंथकर्त्यांनीं केलेला आरंभ व प्रयत्न स्तुत्य आहे. अशीं पुस्तकें आपले मुलाबाळांसमोर जितकीं येतील, तितकीं आपले देशास फायदेशीर आहेत."

सदर कामाबद्दल आपणांस १००० रुपये बाबाशाई देण्याविषयीं हुजूरची आज्ञा झाली आहे. ही रक्कम आपण खानगी कारभारी यांजकडून मिळण्याबद्दल मागणी केली असतां मिळेल.

ता. २५–१२–१८८८. मु. पांचगणी.

(सही) पेस्तनजी दोराबजी."

हे पैसे मिळाले. पण तिथें संपादक आणि प्रकाशक यांच्यांत संदेह उत्पन्न झाला कीं, हे पैसे कुणाला मिळाले व कोणी घ्यावे ?

या संघर्षाचाहि उज्ज्वल विशेष हा कीं, पैसे आपणाला मिळावे असें दोघांपैकीं कोणीच म्हणत नव्हता. आपणांसाठीं हे पैसे नाहींत, आपल्या सहकाऱ्याचा त्यांवर हक्क आहे, असेंच प्रत्येकजण म्हणत होता !

जावजीशेटचें म्हणणें कीं, संपादकीय कामगिरीला मिळालेलें हें पारितोषिक आहे; तें संपादकांनींच घ्यावें हें योग्य. आपला त्यावर हक्क नाहीं.

आणि संपादकांनीं म्हणावें कीं, मासिकाच्या उत्कृष्ट छपाईबद्दल हें पारितोषिक आहे; तें छापखान्यालाच मिळालें पाहिजे. संपादकाचा त्याच्याशीं संबंध नाहीं.

वृत्तपत्रांतून देखील या गोड गोष्टीची चर्चा झाली. अखेर 'ज्ञानचक्षु' पत्रानें समजुतीचा लेख लिहून महाराजांकडून मिळालेलें हें पारितोषिक संपाकांनाच मिळणें कसें उचित हें सांगितलें. आणि तें गोड प्रकरण अधिक गोड होऊन मिटलें.

## ११ : भाग्यवती अखेर

जावजी दादाजी स्वतः जरी पुस्तकी सुशिक्षित नव्हते, तरी त्यांना विद्यार्जनाची फार आवड होती. आणि त्यासाठीं कोणत्याहि वेळीं ते उदार मनानें हातभार लावीत.

तेव्हां मुंबईंत वक्तृत्वोत्तेजक मंडळीची यशस्वी स्थापना होण्याला जावजीशेटजींची सक्रिय सहानुभूतीच कारण होती. लोकांनीं ती सुंदर कल्पना काढली खरी. पण वक्तृत्वाला उत्तेजन द्यायचें तर त्यासाठीं प्रथम बक्षिसांची

तयारी हवी. त्याखेरीज विद्यार्थांत व तरुण लोकांत अशा नवीन गोष्टीची आवड कशी उत्पन्न होणार ?

आणि सगळचा गोष्टी अडतात त्या पैशासाठींच.

लोकांनीं आपली योजना जावजीशेटपुढें मांडली. त्यांना ती फार आवडली. त्यांनीं लगेच विचारलें, "यासाठीं पैसा तरी किती लागेल तुम्हांला ?"

ओकांनीं एकंदर अंदाज घेऊन ३०० रुपयांचा आंकडा सांगितला.

"तेवढी रक्कम माझ्याकडे लागली. तुम्ही बेलाशक कामाला सुरुवात करा." जावजीशेटकडून तत्परतेनें अनुकूल उत्तर मिळालें.

लगेच 'इंदुप्रकाश' पत्रांत ही नवलाईची गोष्ट प्रसिद्ध हि झाली. वक्तृत्वासाठीं १४५ रुपयांचीं बक्षिसें जाहीर झालीं. सर्वांनाच तें वाचून मोठें नवल वाटलें.

छापखान्याचा धंदा मुंबईंत असा वाढूं लागला; तशी सर्व छापखानेवाल्यांच्या सोईसाठीं प्रिंटर्स-पब्लिशर्स असोसिएशन स्थापन झाली. तेव्हांचा काळ आजच्या काळाहून निराळा होता. छापखान्यांत काय छापावें व काय छापूं नये, याविषयीं तेव्हांच्या इंग्रज सरकारच्या विशिष्ट भावना कांहींशा उग्र व तीव्र होत्या. त्यांतून गुण्यागोविंदानें वाट काढण्यांत जावजीशेटनीं नुसता पुढाकार घेतला इतकेंच नव्हे, तर असोसिएशनच्या सभा देखील त्यांच्याच छापखान्यांत भरत असत.

अशीच हेमंत व्याख्यानमाला मुंबईंत तेव्हां चालू झाली, तिला देखील सर्वतोपरी जावजीशेटजींची मदत होतीच. मालेचीं व्याख्यानें छापून देण्याची खर्चाची जोखीम पत्करल्याबद्दल न्यायमूर्ति तेलंग यांनीं एका समारंभांत जावजी दादाजींविषयीं कृतज्ञतेचे गौरवपर उद्गार काढले. तेव्हां त्या स्तुतीनें जावजींचें मस्तक भारावल्यासारखें झालें. इतकी लीनता त्यांच्या ठायीं होती.

ते मित्रमंडळींत हळूच म्हणाले, "माझें नांव कोणीं कशाला घ्यावें ? पाहिजे तर एक 'मराठ्यांचा हितचिंतक' हातभार लावायला पुढें आला असें म्हणावें म्हणजे पुरे."

परंतु बहुजनसमाजासमोर व गोरगरिबांसमोर इतके लीन असलेले जावजी दादाजी स्वभावानें निरंतर लीन जरी खरे, तरी तितकेच ते सात्त्विक स्वाभिमानीहि होते. आपली अशी लीनता गोरगरिबांना व बहुजनसमाजाला विरंगुळा देणारी ठरते, तीच राजामहाराजांसमोर अपमानास्पद लाचारी ठरण्याचा संभव आहे, अशी निर्मळ जाणीव निरंतर त्यांच्या मनींमानसीं वसे, असें दिसतें.

एकदां एका महाराजांनीं मुद्रण व्यवसायांतील जावजी दादाजींची कीर्ति ऐकून त्यांना आपल्या भेटीला बोलावलें. त्या आमंत्रणाला मान देऊन जावजीशेट महाराजांच्या बंगल्यावर त्यांना भेटायला गेले. परंतु तेवढ्यांत दुसरेच कोणी एक बडे गृहस्थ महाराजांच्या भेटीला आले. आणि महाराज त्यांच्याशीं बोलण्यांत गुंतून गेले.

"तुम्ही पुन्हा या," असा आंतून महाराजांचा निरोप आला. तो ऐकून जावजीशेट आले तसे माघारे गेले. पण ते पुन्हा कांहीं त्या महाराजांच्या भेटीला गेले नाहींत.

अशा थोर माणसांच्या कांहीं अढळ निष्ठाहि असतात. अशीच जावजीशेटजींची त्यांचे मित्र व डॉक्टर अण्णा कुंटे यांच्यावर अढळ निष्ठा होती. ते कुंटचांखेरोज दुसऱ्या कोणाहि डॉक्टरचें औषध घ्यायला कधीं तयार व्हायचे नाहींत. ते उघड उघड म्हणायचेहि, "डॉक्टर कुंटचांच्या औषधानें मला मरण आलें तरी हरकत नाहीं. पण दुसऱ्यांचें औषध मीं घ्यायचा नाहीं."

अनेक लोकोपयोगी कार्यांना जसा जावजी दादाजींचा उपराळा असे, तशाच त्या काळाला अनुसरून ज्ञातिधर्माच्या उन्नतीसाठींहि उपराळा असे. अशा सर्वतोपरी लोकप्रिय व राजप्रिय थोर गृहस्थाचा गौरव करावा असें सरकारला तेव्हां वाटलें तर त्यांत नवल नाहीं. सरकारनें त्यांना जे. पी. (जस्टिस ऑफ् दि पीस) ही बहुमानदर्शक पदवी अर्पण केली.

तेव्हां जावजी दादाजी सभोंवारच्या मंडळींत हंसतमुखानें म्हणाले, "कशाला ही पदवी मला दिली सरकारनें ! मला तर या पदवीचा अर्थहि कळत नाहीं. त्यापेक्षां ती राजारामशास्त्री भागवतांना द्यायला हवी होती."

असा हा एक अशिक्षित सामान्य मजूर स्वतःच्या दानतोवर व कर्तबगारीवर एवढ्या महत्पदाला चढला.

आणि हें सारें वैभव, ही सारी भरभराट अवघ्या त्रेपन्न वर्षांच्या वयांत. दरमहा तीन रुपये पगारावर रहाणारा पोरगेला अशिक्षित मजूर लाखों रुपयांच्या दौलतीचा धनी झाला; आणि कारखान्यांतील नोकरांना दरमहा चार चार हजार रुपये पगार वांटूं लागला! आणि लोकप्रियते-प्रमाणेंच राजप्रियतेचें शिखर गांठून सन्मानपूर्वक सन १८९२ सालीं इहलोकची यात्रा संपवून गेला. पण तो गेला कसें म्हणावें! तो देहानें गेला तरी स्मृतीनें असा चिरंजीव होऊन बसलेला आपण पहातच आहोंत कीं!

कै. महाराष्ट्रभाषाचित्रमयूर श्री. कृष्णाजी नारायण आठल्ये यांच्या काव्यमय शब्दांत या थोर पुरुषाच्या चरित्रकथेचें भरतवाक्य म्हणायचें तर--

वैराग्यशास्त्रविरहित पुतळा जो शुद्ध साधु रीतीचा,  
नीतीचा सागर तो भोक्ता सत्संग माधुरी तीचा.  
झाला न शिकुनि बी. ए. नाहीं कीं वेदशास्त्रही पढला,  
लढला प्रयत्नशस्त्रें सन्मार्गें श्रेष्ठतेप्रती चढला.  
उद्योगसत्यविनयें मानवता फार फार लोकांना,  
तो काला वश होतां पात्र नव्हे विषय काय शोकाला?  
'वागूं जगांत कैसा? घरजनांचें भरूं कसें पोट?'  
पुसतां कोणी मजला दाविन मी जावजींकडे बोट.

9235 दि. 2014
बा.वा.
BVBK-0401235

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रॅंकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.